# मनोहरराय सरदेसाई हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व..!

## उदय भेंब्रे यांचे प्रतिपादन साखळी सरकारी महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड



**साखळी : 'मनोहरराय सरदेसाई जीण आनी वावर' या विषयावरील परिसंवादाच्या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित असलेल साहित्यिक उदय भेंब्रे, अध्यक्ष वसंत सावंत, प्राचार्य डॉ. नामदेव गावस, सचिव श्री. के. श्रीनिवासराव व मान्यवर.**

पर्वरी, दि. १६ : मनोहरराय सरदेसाई यांनी आपल्या बहुमूल्य योगदानाने कोकणी भाषेला समृद्ध केले. कोकणी चळवळ, शिक्षण तसेच साहित्य क्षेत्रात त्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली कारण मनोहरराय सरदेसाई हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक, कादंबरीकार आणि विचारवंत उदय भेंब्रे यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय साखळीतील कोकणी विभाग, गोवा कोकणी अकादमी, राजभाषा संचालनालय आणि साहित्य अकादमी नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या मनोहरराय सरदेसाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'मनोहरराय सरदेसाई जीण आनी वावर' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी सन्माननीय अतिथी म्हणून गोवा कोकणी अकादमीचे अध्यक्ष वसंत सावंत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, साहित्य अकादमी नवी दिल्लीचे सचिव श्री. के. श्रीनिवासराव, साहित्य अकादेमीच्या कोकणी सल्लागार मंडळाचे निमंत्रक मेल्विन रॉड्रिगीस, साहित्य अकादमी मुंबई प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी अधिकारी ओमप्रकाश नागर, गोवा कोकणी अकादमीचे सचिव पराग नगर्सेकार आणि खास आमंत्रित म्हणून सुनील सरदेसाई उपस्थित होते. उद्घाटनसत्राच्या अध्यक्षपदी साहित्य अकादमीच्या कोकणी सल्लागार मंडळाचे निमंत्रक मेल्विन रॉड्रिगीस हे होते. सूत्रसंचालन करून आभार साहित्य अकादमी मुंबई प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी अधिकारी ओमप्रकाश नागर यांनी मानले. तर समारोप सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मराठीतील ज्येष्ठ कवी दशरथ परब उपस्थित होते. हेन्री मेंडोण्सा यांनी परिसंवादाविषयीचे टिपण सादर केले. समारोप सोहळ्याचे सूत्रसंचालन कला शाखेची विद्यार्थिनी सुरयना गावकर यांनी केले तर आभार प्रा. उर्वशी नाईक यांनी मानले.

**मान्यवर तज्ज्ञांनी उलगडले सरदेसाईंच्या साहित्याचे अंतरंग**

पहिल्या सत्रात डॉ. सोनिया सिरसाट म्हणाल्या की मनोहरराय सरदेसाई यांची कविता काव्यलंकारांनी नटलेली आहे. मनोहरराय सरदेसाई यांच्या कवितेत आढळणारा सामाजिक स्वर त्या काळातील समाजजीवन दर्शवितो. तर हेन्री मेंडोन्सा यांनी मनोहरराय सरदेसाई यांच्या कवितेते तत्त्वज्ञान आणि व्यक्तिमत्त्व यांचा सुरेख मेळ झाला असल्याचे स्पष्ट करून त्यांच्या कवितेची शैली विशद केली. दुसऱ्या सत्रात उमेश मनोहर सरदेसाई, लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. पांडुरंग फळदेसाई, लुईस गोमीश यांनी शोधनिबंध सादर केले.